**दाव्याची मुळ प्रत**

Exh-1/A

## मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर,अंबाजोगाई यांचे न्यायालयात

रे.दि.दावा नं.706 /२०२५.

**वादी** :- महादेव पिता श्रीराम कदम वय ५५ वर्ष धंदा नौकरी व शेती, रा.चनई ता.अंबाजोगाई जि.बीड.

**विरुध्द**

**प्रतिवादी** :- १) सदाशिव पिता श्रीराम कदम वय ४९ वर्ष धंदा शेती, रा.चनई ता.अंबाजोगाई जि.बीड.

२) ज्ञानोबा पिता श्रीराम कदम वय ४७ वर्ष धंदा नौकरी व शेती, रा.चनई ता.अंबाजोगाई जि.बीड.

३) हनुमंत पिता श्रीरामकदम वय ४१ वर्ष धंदा नौकरी, रा.सदर.

४) संगीता भ्र.तुकाराम कदम वय ३७ वर्ष धंदा व रा.सदर.

५) शंभुराजे पिता तुकाराम कदम वय १५ वर्ष धंदा शिक्षण, अ.पा.क.आई प्रतिवादी क्र.४ संगीता भ्र.तुकाराम कदम रा.सदर.

६) शुभ्रा पितातुकाराम कदम वय १२ वर्ष धंदा शिक्षण, अ.पा.क.आई प्रतिवादी क्र.४ संगीता भ्र.तुकाराम कदम रा.सदर.

**दावा** :- सरस निरस मानाने वाटणी करुन स्वतंत्र ताबा मिळणे बाबत.

**वादी आपले वादपत्र खालील प्रमाणे सादर करीत आहेत.**

१) हे की, वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ६ हे मौजे

पान नं.२ वर ....

चनई ता.अंबाजोगाई जि.बीड येथील रहीवाशी असुन वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ आपसात सख्खे भाऊ असुन प्रतिवादी क्र.४ ही वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा मयत भाऊ तुकाराम पिता श्रीराम कदम यांची पत्नी असुन प्रतिवादी क्र.५ व ६ ही प्रतिवादी क्र.४ ची मुले म्हणजेच वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ चे पुतणे आहेत.

२) हे की, वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ६ हिंदु एकत्र कुटूंबाचे घटक आहेत. वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ६ यांच्या हिंदु एकत्र कुटूंबाच्या शेत जमीनी मौजे चनई ता.अंबाजोगाई जि.बीड येथे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | गट नंबर | क्षेत्रफळ हे.आर | आकार रु.पैसे | कोणाचे नांवे |
|---|---|---|---|---|
| १) | ११४ | ०.१४ | ०-४६ | प्रतिवादी क्र.१ चे नांवे |
| २) | ११४ | ०.१४ | ०-४६ | प्रतिवादी क्र.३ चे नांवे |
| ३) | ११४ | ०.१४ | ०-४६ | प्रतिवादी क्र.४ ते ६ चे नांवे |
| ४) | १६० | ०.४२ | १-३१ | प्रतिवादी क्र.१ चे नांवे |
| ५) | १६० | ०.४२ | १-३१ | प्रतिवादी क्र.३ चे नांवे |
| ६) | १६० | ०.४२ | १-३१ | प्रतिवादी क्र.४ ते ६ चे नांवे |
| **एकुण :** | | **१.६८** | **५-३१** | |

वरिल मिळक्तीस प्रस्तुत दाव्यात यापुढे "वादग्रस्त मिळकत" म्हणुन संबोधण्यात येत आहे.

पान नं.३ वर ...

३) हे की, वादग्रस्त मिळकतीची वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचे मध्ये आपसात यापुर्वी कधीही कसल्याही प्रकारे वाटण्या झालेल्या नाहीत. केवळ कुटूंबाच्या सोयी करीता प्रतिवादी क्र.१ व ३ आणि वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ चा भाऊ म्हणजेच प्रतिवादी क्र.४ चे पती आणि प्रतिवादी क्र.५ व ६ चे वडील नामे तुकाराम पिता श्रीराम कदम या तिघांच्या नांवे समान करण्यात आल्या होत्या. पुढे तुकाराम पिता श्रीराम कदम हा मयत झाल्यानंतर वारसा अधारे तुकाराम पिता श्रीराम कदम यांचे नांवे असलेल्या मिळकतीस वारसा अधारे प्रतिवादी क्र.४ ते ६ च्या नांवे वारसाचा फेर घेण्यात आलेला आहे. वास्तविक पहाता प्रतिवादी क्र.१ व ३ आणि प्रतिवादी क्र.४ ते ६ यांच्या नांवे असलेल्या वरिल वादग्रस्त मिळकती मध्ये यातील वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा प्रत्येकी १/५ आणि प्रतिवादी क्र.४ ते ६ यांचा एकुण १/५ हिस्सा आहे. मात्र सदर वादग्रस्त मिळकतीची वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ६ हे हिंदु एकत्र कुटूंबाचे घटक या नात्याने वरिल पुर्ण वादग्रस्त मिळकतीची वहिती करुन उपभोग घेत आलेले आहेत.

४) हे की, वागद्रस्त मिळकती मध्ये वादीचा कायदेशिर १/५ हिस्सा असतांना केवळ वादग्रस्त मिळकत ही त्याचे नांवे नसल्यामुळे वादीला शासनाच्या योजनांच्या लाभापासुन वंचीत रहावे लागत आहे, याकरीता वादीने दिनांक २५/१०/२०२५ रोजी यातील प्रतिवादी क्र.१ ते ६ यांना वादग्रस्त मिळकतीची सरस निरस मानाने वाटणी करुन त्यातील वादीच्या कायदेशिर १/५ हिस्याचे क्षेत्र वेगळे काढुन ते वादीच्या स्वतंत्र ताब्यात देण्याची विनंती केली असता, प्रतिवादींनी त्यास स्पष्ट नकार दिला. करीता

पान नं.४ वर ....

वादीला प्रतिवादींच्या विरुध्द मा.न्यायालयात प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले असुन दाव्याचा जवाब देण्याची जवाबदारी प्रतिवादींवर आहे. दावा हक्क प्राप्तीची तारीख २५/१०/२०२५ ईसवी ही आहे.

५) हे की, दाव्यातील वादग्रस्त मिळकती या मा.न्यायालयाचे कार्यक्षेत्रातील असल्याने प्रस्तुतचा दावा मा.न्यायालयास दाखल करुन घेवुन चालविण्याचा अधिकार आहे.

६) हे की, वादीचा दावा सरस निरस मानाने वाटणी करुन स्वतंत्र ताबा मिळण्या संबंधीचा असल्याने वादी मा.न्यायालयाचे आर्थिक अधिकार मर्यादे करीता दाव्याचे मुल्य वादग्रस्त मिळकतीचा एकुण शेतसारा ५ रुपये ३१ पैसे चे २०० पट म्हणजेच ५.३१X२००=१,०६२/- रुपये करत असुन कोर्ट फिस करीता शेतसाऱ्याच्या ८० पट म्हणजेच ०५.३१X८०=४४५/- रुपये होतात, त्यावर वादी ठराविक कोर्ट फिस रक्कम रुपये २००/- देत आहे, जी की योग्य व पुरेशी आहे.

**तरी विनंती की,**

वादीचा दावा प्रतिवादींच्या विरुध्द खालील प्रमाणे डिक्री करण्यात यावा.

अ) मौजे चनई ता.अंबाजोगाई जि.बीड येथील दाव्याचे परिच्छेद क्र.२ मध्ये दर्शविलेल्या वादग्रस्त मिळकतीची सरस निरस मानाने वाटणी करुन त्यातील वादीच्या कायदेशिर १/५ हिस्याचे क्षेत्र वेगळे काढुन ते वादीच्या ताब्यात स्वतंत्र मालक म्हणुन देण्यात यावे.

ब) वादीस प्रतिवादींकडुन प्रस्तुत दाव्याचा खर्च देवविण्यात यावा.

पान नं.५ वर ....

क) वादी अन्य ज्या मागणीचा कायद्यान्वये हक्कदार ठरतो ती वादीच्या हक्कात मंजूर केली जावी.

दिनांक: १७ /११/२०२५.

वादी,

महादेव पिता श्रीराम कदम,
रा.चनई ता.अंबाजोगाई जि.बीड.

प्रतिज्ञेवर सत्य निवेदन करतो की, प्रस्तुतच्या दाव्यातील परिच्छेद क्र.१ ते ४ मधील संपुर्ण मजकुर माझ्या माहिती आणि समजुती प्रमाणे खरा व बरोबर असुन कलम नं.५ व ६ मधील मजकुर कायदेविषयक असल्याने तो वकील साहेबांच्या सल्यानुसार खरा व बरोबर आहे, करीता यावर मी आज माझ्या समजुन उमजुन स्वाक्षऱ्या केल्या आहेत, त्या खऱ्या आहेत.फ.

दिनांक: १७/११/२०२५.

वादी,

महादेव पिता श्रीराम कदम,
रा.चनई ता.अंबाजोगाई जि.बीड.

मार्फत:

ॲड.पी.जी.शिंदे,
अंबाजोगाई

Order- Dt.14/11/2025
Issue suit summons to defendant for settlement of issues and for filing written statement if any. Returnable on 24/12 /2025

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SAGADE PRAVIN PRABHAKAR
Date: 2025.11.15 10:46:19 +0530

Jt. C.J.J.D.Ambajogai